# MAHARASHTRA ACT No. LXIII OF 1974

## THE INDIAN ELECTRICITY (MAHARASHTRA AMENDMENT AND VALIDATION) ACT, 1974

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ५ डिसेंबर १९७४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एल. डब्ल्यू. धुरंधर,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. LXIII OF 1974

## AN ACT FURTHER TO AMEND THE INDIAN ELECTRICITY ACT, 1910 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA AND VALIDATE CERTAIN ACTION

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २७ डिसेंबर १९७४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३

**भारतीय वीज अधिनियम, १९१० महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी आणि विवक्षित कारवाई विधिग्राह्य करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** भारतीय वीज अधिनियम, १९१० महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, त्यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी तात्काळ कारवाई करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्यपालांची खात्री झाली होती ; व म्हणून त्यांनी भारतीय वीज (महाराष्ट्र सुधारणा आणि विधिग्राह्य करणे), अध्यादेश, १९७४ हा २७ ऑक्टोबर १९७४ रोजी प्रख्यापित केला ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचवीसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास भारतीय वीज (महाराष्ट्र सुधारणा आणि विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल ;

(२) तो, २७ ऑक्टोबर १९७४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९१० चा अधिनियम क्रमांक नऊ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२. भारतीय वीज अधिनियम, १९१० (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना त्याच्या कलम ३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) नंतर पुढील नवीन पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल आणि ते नेहमीसाठी समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"(१अअ) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेली प्रत्येक अनुज्ञप्ती, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.";

(२) पोट-कलम (२) मधील खंड (क) नंतर पुढील नवीन खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो नेहमीसाठी समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल :—

"(कक) या भागाखालील अनुज्ञप्ती, शासकीय राजपत्रात ती ज्या तारखेस प्रसिद्ध करण्यात येईल त्या तारखेपासून अंमलात येईल ;"

आणि तदनुसार, मुख्य अधिनियमाच्या कलम ३, पोट-कलम (२), खंड (कक) याच्या उपबंधांशी विसंगत असतील असे, मुख्य अधिनियमान्वये केलेल्या आणि त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा अशा कोणत्याही अनुज्ञप्तीचे उपबंध, निरसित होतील आणि ते नेहमीकरिताच निरसित झाल्याचे मानण्यात येईल.

सन १९१० चा अधिनियम क्रमांक नऊ याच्या कलम ६ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये,—

(१) पोट-कलम (६) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल व तो नेहमीसाठी दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :—

"(६) ह्या कलमान्वये उपक्रम विकत घेण्याबद्दलच्या विकल्पाचा वापर करण्यासंबंधीची नोटीस अनुज्ञप्तीधारकावर बजावण्यात आली असेल त्याबाबतीत, खरेदीची किंमत आणि व्याज यांबद्दल निर्णय होऊन ती रक्कम देण्यात येईपर्यंत, अनुज्ञप्तिधारक, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली संबद्ध मुदत संपल्यानंतर, राज्य वीज मंडळ, राज्यशासन किंवा यथास्थिति स्थानिक प्राधिकरण याजकडे उपक्रम सुपूर्द करील.";

(२) पोट-कलम (७) मध्ये 'खरेदीची किंमत' या मजकुरानंतर पुढील मजकुराची भर घालण्यात येईल आणि ती नेहमीसाठी घालण्यात आल्याचे मानण्यात येईल :—

"आणि उपक्रम सुपूर्द करण्याच्या वेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या चालू असलेल्या दराने व्याज अधिक उपक्रमाच्या खरेदी किंमतीवर, उपक्रम सुपूर्द केल्याच्या तारखेपासून खरेदीची किंमत दिल्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीसाठी दर शेकडा एक एवढी रक्कम."

विधिग्राह्य करणे.

४. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी मुख्य अधिनियमाच्या कलम ६, पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही अनुज्ञप्तिधारकावर, महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून बजावण्यात आलेली किंवा बजावली असल्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही नोटीस, किंवा अशा नोटीशीच्या अनुरोधाने मंडळाकडे अनुज्ञप्तीधारकाने उपक्रम सुपूर्द करणे किंवा सुपूर्द केल्याचे अभिप्रेत असणे ही गोष्ट या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमानुसार बजावण्यात किंवा सुपूर्द करण्यात येईल आणि बजावण्यात किंवा सुपूर्द करण्यात आल्याचे मानण्यात येईल. आणि तदनुसार, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही असले तरी, कोणत्याही अनुज्ञप्तिधारकावर बजावण्यात आलेली

अशी कोणतीही नोटीस वैध रीतीने आणि परिणामकारक रीतीने बजावण्यात आल्याचे किंवा उक्त मंडळाकडे त्याच्याकडून सुपूर्द करण्यात आलेला उपक्रम हा वैध रीतीने व परिणामकारक रीतीने सुपूर्द करण्यात आल्याचे मानण्यात येईल ; आणि अशा रीतीने बजावण्यात आलेली कोणतीही नोटीस ही कलम ६, पोट-कलम (१) च्या उपबंधाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, अनुज्ञप्तिधारकावर बजावण्यात आली नव्हती किंवा अनुज्ञप्तिधारकाने कलम ६, पोट-कलम (६) अन्वये उक्त मंडळाकडे उपक्रम सुपूर्द केला व तो, खरेदीची किंमत आणि उपक्रम सुपूर्द केल्याच्या तारखेपासून खरेदीची किंमत मिळाल्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीसाठी कोणतेही व्याज मिळाल्याशिवाय, उक्त उपक्रमास मुकला याच एका कारणावरून, कोणत्याही न्यायालयात हरकत घेण्यात येणार नाही (आणि हरकत घेण्यात आली तरी ती दाखल करून घेतली जाणार नाही).

५. या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी एखाद्या व्यक्तीने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात, जर या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आली नसती तर असे कृत्य किंवा वर्जन हे मुख्य अधिनियमाखाली अपराध ठरले नसते तर, अशी व्यक्ती कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरणार नाही. व्यावृत्ती.

६. (१) भारतीय वीज (महाराष्ट्र सुधारणा व विधिग्राह्य करणे) अध्यादेश, १९७४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. अठरा याचे निरसन.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे, सुधारण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

प्रा. म. कलकर्णी,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.